International Theatre Institute
World Organization for the Performing Arts
Indian Centre of ITI

IAPAR
INTERNATIONAL ASSOCIATION FOR PERFORMING ARTS AND RESEARCH

# जागतिक रंगभूमी दिवस २०२३

जगभरातील माझ्या मित्रांनो, रंगकर्मींनो…

जागतिक रंगभूमीदिनानिमित्त हा संदेश लिहिताना आपल्याशी मी संवाद करते आहे या कल्पनेनं मी भारावून गेले आहे… आणि त्याचवेळी आपण सर्व रंगकर्मी आणि अन्य कलाधर्मी आज जगभरातल्या अनंत तणावांच्या ओझ्याखाली पिचत असल्याच्या जाणीवेनं माझ्या शरिरातला कण न कण थरारून उठतो आहे. जगभरात सुरु असलेले आपसातील संघर्ष, युध्दं, नैसर्गिक आपत्ती या सर्वांमुळे निर्माण झालेल्या अनिश्चीततेचा आपल्या केवळ भौतिकच नव्हे तर आत्मिक आणि मानसिक भावजीवनावरही प्रत्यक्ष, थेट परिणाम होतो आहे.

आज आपल्याशी हे बोलताना मला जाणवतंय की सर्व जगच एकेका स्वतंत्र बेटासारखे आपापले जगत आहे… किंवा आपण आपापल्या बोटी घेऊन धुक्यानं भरलेल्या क्षितिजापारच्या किनाऱ्याकडे निघालो आहोत. या प्रवासाला ना कुठली दिशा आहे, ना कुणी दिशा देणारे दिसते आहे. आणि तरिही आपण बोटी हाकतोच आहोत. या कर्कश्श गर्जणाऱ्या खवळलेल्या समुद्रातून एका आशेने जात आहोत की एक शांत, सुरक्षित किनारा आपल्याला नक्की सापडेल!

आजवर कधीही आलं नसेल इतकं सारं जग जसं एकमेकांच्या जवळ आलं आहे, तितकंच ते कधी नव्हे इतकं परस्परांपासून दूर गेलं आहे… हा असा नाट्यमय विरोधाभास आजच्या या समकालीन विश्वानं आपल्यावर लादला आहे. वाढती संपर्कमाध्यमे आणि घटनांच्या देवाणघेवाणीच्या तंत्रज्ञानामुळे आम्ही भौगोलिक सीमारेषांचे अडथळे जरी पार करू शकलो असलो तरी, हे झगडे, तणाव यामुळे तर्कसंगत दृष्टीकोनच हरवून जात असल्याचा अनुभव घेत आहोत. या अभिसरणाऐवजी अपसरणाचीच स्थिती निर्माण करत आहोत, ज्यायोगे आपल्या जगण्यातला साध्या, निर्व्याज माणुसकीचा आशयच हरवून बसतो आहोत.

रंगकर्माचा मुख्य आशय हा मानवी वर्तनातील शुध्द मानवतेतच दडला आहे. थोर अग्रणी कोन्स्तांतिन स्तानिस्लाव्हस्कीं म्हणतात, धूळभरल्या पावलांनी रंगमंचावर प्रवेश करू नका. ती धूळ, ती घाण बाहेरच ठेवून या! तुमच्या काळज्या, विवंचना, क्षुद्र लहानसहान तक्रारी, गाऱ्हाणी जोड्यासोबत बाहेरच ठेवून या, ज्या तुमच्या आयुष्याचा विस्कोट करतील आणि कलेपासून तुम्हाला विचलीत करत लांब नेतील. एका माणसाला एकच आयुष्य लाभते, तसे आपल्याला लाभलेले एकच आयुष्य घेऊन आपण स्टेजवर चढत असतो. स्टेजवर चढणारे जरी आपण एकच असतो, तरी स्टेजवर मात्र आपण आपल्याला असंख्य आयुष्यांमध्ये विभाजीत करण्याची, असंख्य आयुष्यांची निर्मीती करण्याची सर्जक क्षमता बाळगणारे होवून जातो. एक विश्वं आपण निर्माण करतो, फुलवतो ज्याचा गंध जगाला आनंद देणारा असतो.

थिएटरच्या जगातले आपण विना अपवाद सर्वच, मग तो नाटककार असो, दिग्दर्शक, अभिनेता, कवी,

नेपथ्यकार, संगीतकार असो वा तंत्रज्ञ... आपण काय करतो? तर असे एक जग निर्माण करतो जे आपण स्टेजवर जाण्याआधी अस्तित्वातच नसते. या जगाला या आयुष्याला गरज असते काळजीने जपणाऱ्या हातांची जे त्याला घट्ट धरून ठेवेल... एका प्रेमळ उबदार मिठीची, कनवाळू हृदयाची आणि एका विचारी मनाची जे त्याच्या अस्तित्वाला एक प्रयोजन देइल!

मी हे म्हणताना मुळीच अतिशयोक्ती करत नाही, की नाटक हे जीवनाची एक स्वयंभू कृती असते जी काहीच नसण्यातून, शून्यातून उद्भवते. जसे एखाद्या रात्रीच्या काळ्या कभीन्न अंधारात निखारा चेतावा आणि आजूबाजूचा अंधःकार नाहीसा होत थंडाव्यातही एक ऊब, एक ऊर्जा निर्माण व्हावी. आपण जीवनाला मूर्त स्वरूप देतो, वैभवाप्रत नेतो, गतीही देतो आणि खोल अर्थही... जीवनाला समजून घेतो, कलेच्या प्रकाशात, कलेच्या माध्यमातून सर्वप्रकारचे अज्ञान आणि कडवेपणाविरुध्द उभे ठाकतो... जगण्याच्या सिध्दांताला कवेत घेत त्याची जगभर उधळण करतो... आणि या उदात्त उद्दीष्टासाठी आपण आपला वेळ, श्रम, घाम, रक्त, अश्रू पणाला लावतो. सत्य, चांगुलपणा आणि सौंदर्य या मूल्यांच्या जपणूकीसाठी...या दुर्दम्य विश्वासाने की आयुष्य सुसह्य आणि सुखकर व्हायला हवे.

हे मी केवळ बोलायचे म्हणून बोलत नाही, किंवा जगातल्या सर्व कलांची उत्पत्ती जिथून होते त्या रंगभूमीच्या दिनानिमित्त केवळ एक उत्सव साजरा करावा म्हणूनही नाही... तर आवाहन करण्यासाठी की चला, आपण एकत्र येऊ, एक होत हातात हात गुंफत, खांद्याला खांदा लावून - जसे रंगमंचावर बोलतो – तशी एका स्वरात उच्चरवाने जगाला साद घालत जगभरातल्या सदसदविवेकाचे पुनर्जागरण करू... अंतर्यामी हरवत चाललेल्या मानवी संवेदना आणि मानव्याच्या सत्वाचा तळ धुंडाळत शोध घेऊ... स्वतंत्र, संवेदनशील, सहिष्णु, प्रेममय आणि स्वागतशील मनाचा शोध घेऊ... आणि नकार देऊ क्रुर, वंशवादी, संघर्षरत, एकारलेल्या, हट्टी अतिरेकाला... या अथांग आकाशाखाली आणि विपुल पृथ्वीवर मानव हजारो वर्षे वाटचाल करत आला आहे... यापुढेही करीत राहिल. त्याच्या पावलांना माखलेली ही युध्द आणि संघर्षाची दलदल रंगमंचाच्या बाहेरच टाकून त्याला आत येऊ दे.. असुरक्षितता आणि अनिश्चीततेचे मळभ साचून राहिलेल्या मानवतेच्या मुक्तीसाठी... एका निश्चीततेच्या मोकळ्या वातावरणासाठी जिथे आपण अभिमानाने म्हणू की आम्ही सर्व मानव परस्परांचे बांधव आहोत...

विश्वाच्या निर्मीतीनंतर जेव्हा केव्हा पहिला रंगकर्मी जगातल्या पहिल्या रंगमंचावर पहिल्यांदा उभा राहिला तेव्हापासून एक नाटककार या नात्याने आपले हेच उद्दीष्ट राहिले आहे. जे जे अमंगळ आहे, विद्रूप, रक्तरंजीत आणि अमानवी आहे त्या सगळ्याचा विरोध करण्याचे ध्येय... आणि हा विरोध उन्नत, उदात्त आणि उत्तम अशा मानवी मुल्यांच्या पुनर्स्थापनेतून करण्याचे ध्येय...

आणि हे आपण रंगकर्मीच हे करू शकतो... चला, आपण हे करूया... एकात्म मानवतेसाठी... मानवाच्या एकात्मतेसाठी...

समिहा अयुब

इजिप्त

---

International Theatre Institute / World Theatre Day Message 2023
Samiha Ayoub, Actress, Egypt.
Marathi (India) Translation: Abhiram Bhadkamkar